Golden Research Thoughts ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-10 | April-2015 Available online at www.aygrt.isrj.org

१९८० नंतरच्या ग्रामीण कथेतील समाज जीवनाचे दर्शन

सुभाष विठ्ठल [illegible]लारे
मु.पो. कासेगांव ता. पंढरपूर, जि.सोलपूर.

प्रस्तावना :-

[illegible]मीण कथा हा साहित्य प्रकार साहित्यकलेच्या दृष्टीने महत्वाचा प्रकार आहे. ग्रामसंस्कृतीचे चित्र[illegible] [illegible]र[illegible] हे या [illegible]मीण कथेचे वैशिष्ट्ये ठरते म्हणूनच [illegible]ड्यातील निसर्ग, शेती, माणसाची मातीशी जोडलेली नाळ त्याची मातीशी असलेली बांधलकी, लोकाचार, तेथील सामाजिक, धार्मिक, राजकीय जीवन पध्द्ती, त्यांच्या समस्या, मर्यादा, प्रश्न, एकूणच खेड्यातील संपूर्ण जीवन पध्द्तीचा आविष्कार ग्रामीण कथेतून झ ालेला दिसतो.

मराठी ग्रामीण कथेचे स्वरुप :-

मराठी ग्रामीण कथेची समृध्दता ही मराठी भाषेची वैशिष्ट्यपूर्णता आहे. १९६० नंतर मराठी ग्रामीण कथा तारुण्यात बहरुण [illegible]ली असली तरी ख-या अर्थाने कथा जन्माला आली ती हरिभाऊ अपटे यांनी १८९८ मध्ये लिहलेल्या 'काळ तर मोठा [illegible]ठीण आला,' या १८९७ मध्ये पडलेल्या भिषण दुष्काळावरील करुण कथेने १८९८ ते १९८० पर्यंत मराठी ग्रामीण कथा विविध विषय, अशयाच्या माध्यमातून [illegible]लेली दिसते. दारिद्र्य, शोषण, फ़सवणूक, राजकारण, भूक, दुष्काळ, हुंडापध्दती, शेतीतील अधुनिकता, सहकार चळवळी, कर्ज पेढ्या, बॅका, वेगवेगळ्या सोसायट्या, नोकरदार वर्ग, बाराबलुतेदारांचे विविध प्रश्न, कर्जबाजारी, यामुळे उध्वस्त होणारे शेतकरी, सरकारी योजनातून शेतक-यांची होणारी फ़सवणूक आरक्षणामुळे, राखीव जागेमुळे महिलांना, दलितांना मिळालेली सर्वोच्यपदे व त्यातून त्यांची होणारी पिळवणूक अशा अनेक समस्या भोवती मराठी ग्रामीण कथा विस्तारपूर्वक प्रगट झाली आहे.

शेतक-यांचे जीवन उध्दवस्त करणारे एक नैसर्गीक अपत्य म्हणजे दुष्काळ या दुष्काळात त्यांच्या अपेक्षा, स्वप्ने पार जळून खाक होतात याचे विदारक, अंत:करण हेलावून सोडणारे चित्रण हारिभाऊ अपटे यांच्या १८९७ मध्ये महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळावर लिहलेल्या 'काळ तर मोठा कठीण आला' या कथेतून प्रत्ययास येते. तसेच ग्रामीणत्वाचे चित्रणकरुन ग्रामीण कथेच्या दालनात भर घालण्याचे काम वि.स. सुखटनकर, लक्ष्मणराव सरदेसाई, ग.ल. ठोकळ, म.भा. भोसले, ची.य.मराठे, र.वा. दिघे इ. □थाकारांनी केले आहे. खेड्यातील दैन्य, दारिद्र्य, शोषण, अंधश्रध्दा, देवावर असणारी अपार श्रध्दा, जीवन जगण्यासाठी करावा ला□□ारा संघर्ष, अशा असंख्य समस्यांच्या भोव-यात सापडलेले त्यांचे जीवन हे खेड्यातील असणारे विदारक वास्तव त्यांच्या □थेत कोठेच पहावयास मीळत नाही. तर कथेतून अद्‌भूतता, घटना बहुलता, व रंजकात यांनी युक्त असलेली त्यांची कथा वाटते.

श्री.म.माटे यांच्या कथेने मात्र ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्र वाचकासमोर मांडून ग्रामसंस्कृतीतील बारा बलुतेदारांच्या जीवनाचा वेध कथेतून घेवून ख-या ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे. त्याच प्रमाणे वामन चोरघडे, द.रा.कवठेकर यांच्या कथेने थोडाफ़ार ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकलेला दिसून येतो. माणदेशी माणसांचे दु:ख दैन्य, दारिद्र्य परिस्थीतीत जगणारी मा□सं साहित्यात आणून व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण कथेत सारा माणदेशच जिवंत ठेवला आहे. शंकर पाटलांनी विनोदी कथा लिहून □ामजीवनातील असंख्य समस्यावर नेमकेपणाने बोट ठेवले आहे. त्यांनी कथेत दुर्लक्षीत असणा-या ग्रामीण स्त्रीचे चित्रण आपल्या □थेतून केले आहे. सारा प्रपंचा संभाळणारी, पती, सासु, सासरे, मुलं यांच्यावर प्रेम करणारी नव-याचा मार खाणारी, अन्याय सहन □रणारी स्त्री अशी अनेक ग्रामीण स्त्रीची रुपं त्यांनी मांडली आहेत.

भारतात लोकशाही निर्माण झाल्यामुळे सार्वत्रिक निवडणूकाच वारं खेड्यापर्यंत पसरत गेलं त्याच बरोबर शिक्षणाच्या प्रसारामूळे ग्रामीण माणसाच्या सुप्त जाणीवा अंकुरल्या त्या जाणीवा नवकथेच्या माध्यमातून अविष्कृत होऊन ग्रामीण कथांकुर बहरायला ला□ला.

➢ १९८० नंतरची □ामी□ □था :-

१९८० नंतर ग्रामीण व त्या संबंधीत असलेले खेड्यातील असंख्य घटका विषयी एक आपुलकीची जागती भावना ठेवून जीवनातील दैन्य, दारिद्र्य, बेकारी यातील तफ़ावत त्यांना भेडसावू लागल्या. ग्रामीण समाजातील दारिद्र्य, शोषण, अत्याचार, भ्रष्टाचार या विषयी चीड निर्माण होऊ लागली. निवडणूकातील गलिच्छ राजकारण, प्रखर सामाजिक जाणीव, ग्रामीण समाज, □ामीण भागातील सर्वच स्थरातील सर्व सामान्य माणसं, आत्मसंघर्ष, संवेदनशील व चिंतनशिलता या मिश्रणातून १९८० नंतरची □ामीण कथा जन्माला आली.

विज्ञानाचा प्रचार आणि प्रसारामूळे खेडी न्हावून निघाली या नव्या बदलाने खेड्यात अनेक प्रश्न निर्मा□ □ले. दुष्काळाचे आगमन पाणी नियोजनाचा अभाव, ऋतूमानातील बदल, शेती व्यवसायात येणारे आपयश यामुळे शेतक-यांच्या होणा-या आत्महत्या, उच्च शिक्षण घेवूनही नोकरी नाही यामुळे हताश झालेली युवा पिढी, शिक्षणासारख्या पवित्र मानल्या गेलेल्या □त्रात ही माजलेला भ्रष्टाचार, नैतिक मूल्यांची होणारी घसरण, शिक्षण व नोकरी यातून येणारी लाचारी असे असंख्य प्रश्न थोड्याफ़ार प्रमाणात १९८० नंतच्या कथेने स्पर्श केलेला दिसतो. यामध्ये साधारण: भास्कर चंदनशिव, मोहन पाटील, श्रीराम □ुदेकर, राजन गवस, वासुदेव मुलाटे, प्रतिमा इंगोले, द.ता.भोसले, अनुराधा गुरव, ललिता गादगे, यांनी बदलत्या ग्रामी□ जीवनाचा वेध घेऊन ग्रामीण कथा वास्तव पातळीवर आणलेली दिसते.

➢ १९८० नंतच्या ग्रामीण कथेतील सामाजिक जाणीव :-

१९८० पर्यंत ग्रामीण मराठी कथेचा वाचक वर्ग ब-याच प्रमाणात शहरी होता तो ग्रामीण □था अवडीने जरी वाचू लागला असला तरी ग्रामीण पात्र परिसरातून नागरी मन शोधन्याची व तसे मानण्याची वृत्ती होती. १९६० दरम्यान ग्रामीण कथेचे क्षितीज उजळले असले तरी ती नागर कथेच्या हतात हात घालूनच मिरवत होती म्हणूनच ग्रामीण जीवनातील दैन्य, दारिद्रय, असंतोष, चीड, अंधश्रध्दा अत्याचार याचे तटस्थपणे चित्रण तेवढ्याच समर्थपणे झालेले नव्हते मात्र १९८० नंतर ग्रामीण व तत्संबंधी घटका विषयी ए□ अपुलकीची जागती भावना ठेवून जीवनातील दैन्य, दारिद्र्य, बेकारी यातील तफ़ावत त्यांना भेडसावू लागली स्वातंत्र्य,

समता, बंधुता, या सुत्रांचा प्रत्यक्ष समाज जीवनातील फ़ोलपणा निदर्शनास आला यातूनच पारंपारिक दारिद्र्य शोषण अत्याचार भ्रष्टाचार या विषयी चीड निर्माण होवून कथा ग्रामीण भागातील समाज जीवनाचा वेध घेवू लागला.

डॉ. श्रीराम गुंदेकरांची कथा संघर्षशील आहे. समाजाचे संघर्ष सन्मुख मनोबल वाढविण्यात त्यांची कथा यशस्वी ठरलेली आहे. न्याय अन्यायाच्या चित्रणावर भर देवून संघटनात्मक बांधणीतून अन्यायाला गाडून टाकू असा विश्वास व्यक्त करते साहित्यातून समाज मन घडले पाहिजे या जाणिवेने या कथा येतात. मराठी ग्रामीण चळवळीचा प्रभावही या कथेवर दिसतो. १९७०-७५ च्या वेळी ग्रामीण चळवळ दिशा धारण करु लागली होती. मराठी ग्रामीण साहित्यातून ग्रामीण समाजाचे प्रश्न मांडण्या बरोबरच त्यांच्या प्रश्नांच्या मुळाची जाणीव त्याला करुन दिली पाहिजे समाजातील शोषण, भ्रष्टाचार व फ़सव्या राजकारणा विरुध्द शेतक-यांनी संघटनात्मक लढा दिला पाहिजे शेतकरी शेतमजुरांच्या वाट्याला आलेला घास कोण कसा व का पळवितो तो त्याला □ळून त्याविरुध्द विद्रोह करुन आपला हक्क आपण शाबुत ठेवला पाहिजे ही जाणीव कथा विकशीत करते '□ळी, सपाटीकरण, तगई, कोयत्यावाले, गाडीवान' या 'उचल कथासंग्रहातील तर पडझड, तुकडे जोडी कु-हाडीचे दांडे, कुणी हाये का वाली, दुष्काळाच्या गोष्टी, कोंडी, दखल या 'लगाम' कथासंग्रहामधील कथा आहेत. या कथातील संघर्ष हा कधी एकटा नायक करतो तर □धी समुह करतो हा संघर्ष प्रस्तापित व्यवस्थेच्या विरुध्द आहे. प्रस्तापित समाज व्यवस्था कितीही अन्यायी, □□□र व प्रभावीशाली असली तरी त्या व्यस्थेला बळी न पडता स्वत:चा ताठ बाणा नेकपणे जतन करणा-या कथा आहेत. परिस्थितीशी संघर्ष करण्याची प्रचंड उर्मी डॉ. श्रीराम गुंदेकरांच्या कथा प्रकट करतात.

प्रतिमा इंगोल्यांची कथा ही वस्तवादी आहे. दु:ख हे तिचे केंद्र आहे व्यक्ती आणि समाज यांच्यातील बहुपेडी वीण इंगोल्यांच्या कथेत भडकपणे उभी रहात जाते. कथेतून व्यक्त होणारा त्यांचा जीवनाविषयक दृष्टीकोन व्यापक, मानवतावादी आहे. □ामीण जिवनातील अनुभवांना त्यांच्या कथेत महत्वाचे स्थान असुनही जीवन दृष्टीतील संकुचितता, पूर्वग्रहदुषितता किंवा शहर विरुध्द खेडे सरळसोट विभागणी करण्याचा एकारलेपणा त्यांच्या कथेत येत नाही. ग्रामीण जीवनातील दु:खाची त्या अशी सोपी उत्तरे काढीत नाहीत तर जीवनाचा समग्रतेने विचार करुन ग्रामीण जीवनातील दु:खाची कारणे समाज व्यस्थेत शोधण्याचा प्रयत्न □रतात त्यामुळे प्रतिमा इंगोले यांची कथा अधिची कारणे समाजव्यस्थेत शोधण्याचा प्रयत्न करते.

□ामजीवनातील वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर दु:ख बाबाराव मुसळे फ़ार ताकदीने व्यक्त करतात 'मोहरलेला चंद्र' कथेत जन्मापासून दु:ख मागे लागलेल्या पायरुची व्यथा ते साकार करतात. 'भुजंग' कथेत जमीनीच्या वेडाचे सोंग घेणा-या पाटलाची करणी अतिशय नाट्यपुर्ण पध्दतीने सांगतात. माणसातील सृष्ट दृष्ट प्रवृत्तीच्या झगड्याचे अशा सामर्थ्याने वर्णन करणा-या ग्रामीण कथा अपवादात्मकच आहेत. ग्रामीण कुटूंबातील कडू गोड क्षण रंगवणेही त्यांना आवडते 'हार-जीत', 'निंदण' या कथा या दृष्टीने उत्कृष्ट जमलेल्या आहेत जुने बलुतेदारी व्यवसाय जावून नवे व्यवसाय येण्याचा संक्रमणकाळ आणि त्यात गावकुसा बाहेरील जमातीचे भरडले जाणारे भावविश्व यांचे चित्रण मुसळे 'चौघडा', 'घमड्या' या दोन कथामध्ये □रतात. पायाळू माणसांच्या अंगावर पावसाळ्यात वीज पडते ही अंधश्रध्दा 'इंधं' या त्यांच्या कथेचा केंद्रबींदू आहे. पण ही कथा जराही प्रचारात्मक न करता या □था अंधश्रध्देभोवती पावळ्यात ओढ्याला पाणी आले असता एक जीवन नाट्य कशी उभे राहते याचे अतिशय सामर्थ्यशाली दर्शन 'इंधं' या कथेत घडवितात.

□ामी□ मातीतून उगविल्या सारखी वाटणारी बाबाराव मुसळे यांच्या कथेतील माणसं कथा वाचल्यानंतरही मनात रेंगाळत राहतात बाह्य तपशिलात अडकून न पडता बाबारावांची कथा ग्रामीण मनाचे पापूद्रे सुक्ष्मपणे भेदत जाते.

डॉ. वामन जाधव यांची कथा सामाजिक जाणीवेतून निर्माण झाल्यामुळे शोषित कामगार वर्ग, सालकरी मजूर राजकारणात ओढलेली अज्ञानी माणसं, दारिद्र्यामुळे हातबल झालेली माणसं परिस्थितीला कंटाळून आत्महत्या करणारी माणसं, आहे त्या परिस्थितीचा स्विकार करणारी माणसं व त्यांच्या वेगवेगळ्या प्रश्नांचा तळापर्यंत जावून वेध घेणारी त्यांची कथा आहे. त्याच बरोबर गरिबी, राजकारण, बेरोजगारी, अशा असंख्य समस्यांच्या विळख्यात सापडलेल्या ग्रामीण समाजातील अनेक माणसांचे जीवन उद्ध्वस्त करणा-या कथा समोर येतात.

समाजात वावरणारी राजकीय पिंड असणारी मुरब्बी माणसं आरक्षणाचा उपयोग करुन समाजातील दुबळ्या माणसांचा शोध घेत असतात व त्यांच्या गरिबीचा व दुबळेपणाचा फ़ायदा घेवून राजकारणात स्वत:ची पोळी भाजून घेवून दुस-याच्या संसाराची राख रांगोळी करुन स्वत:चा स्वार्थ साधू पाहणारी माणसं आज प्रत्येक समाजात पहावयास मिळतात. राजकारणाचा वारसा नसलेल्या माणसांना राजकारणात आल्यानंतर अवघडल्या सारखं वाटतं स्त्रीसाठी राखीव जागा असल्यास आणि ती स्त्री अज्ञानी असल्यास तिची होणारी गफ़लत, राजकारणात वावरत असताना परपुरुषाशी आलेला संबंध यामुळे समाजातील स्त्रियां-ची

दिलेले टोमने सहन न करता ती आत्महत्या करते. यांचे विदारक चित्रण आक्रोश कथेतून पहावयास मिळते. आईचे छत्र हरविलेली मुक्ता मावशीकडे झोपडपट्टीत राहते. बंगल्यात मावशीसोबत धुणंभांडी करायला जाते तेव्हा तिला तेथे मस्कापाव खाणारं गुबगुबीत असं कुत्र्याचं पिल्लु दिसते. त्याच बरोबर पोटात भुकेचा डोंब उठलेल्या माणसांचा आणि कुत्र्याचा शिळ्या भातासाठी चाललेला संघर्ष चित्रीत करताना डॉ. वामन जाधव कृषी प्रधान भारत देशाबरोबरच भारत हा तफ़ावतीच्या देश आहे हे दाखवून देतात. एक बाजूला पोटाचं खळगं भरण्यासाठी टाकून दिलेल्या शिळ्या भातासाठी कुत्र्याबरोबर संघर्ष करणारा व□तर दुस-या बाजूला पावाल मस्का लावून कुत्र्याला खावू घालणारा वर्ग अशी समाजात असणारी तफ़ावत मांडताना त्यांनी कोठेही संकोचितपणा ठेवलेला दिसत नाही.

'शपथ', 'तिकीट' या कथेतून राजकारणातील कुरघोड्या, पक्ष प्रेम, बंडखोरी, पैशाची उधळन, घराणेशाहीचे राजकारण पाहवयास मिळते. राजकारणी मतदारावर विश्वास ठेवत नाहीत म्हणून 'शपथ' या कथेतील पुढारी पवीत्र अशा धर्मग्रंथावर हात ठेवून शपथ घ्यायला लावून मतदाराला मतदान करण्यास भाग पाडतात.

उच्च विद्या विभूषीत असणार आजचा युवक बेरोजगार म्हणून फ़िरतो आहे. समाजात त्याला हिनतेची वागणूक दिली जाते त्यामुळे त्या युवकाला गावात वावरण्याची लाज वाटते अशा बेकार तरुणाच्या जीवनाचे चित्रण 'अंधार' कथेतून येते. □ामी□ राजकारण, ग्रामीण स्त्री, दैन्य, दारिद्र्य, भूक , सहकारी क्षेत्रील शोषण, भ्रष्टाचार बदलते शैक्षणीक धोरण कथेतून पहावयास मिळते.

२१ व्या शतकात विज्ञानयुगातही समाजात अंधश्रधेने थैमान घातलेले दिसून येते. देवाच्या नावावर पशुबळी दिला जातो. अर्थिक परिस्थिती असो अथवा नसो ती माणसं अनिष्ठ रुढी परंपरा आत्मसात करतात. पोतराजाला देवाचा दुत मानून त्याची पुजा □रतात. तेव्हा लोकसाहित्यात भेटणारा पोतराज डॉ. वामन जाधव यांच्या 'हालगी' या कथेतून विनोदी स्वरुपात दिसतो.

□ामीण समाजात लग्नाचं वय झालेल्या मुलींना सोबत घेवून राहण्यापेक्षा मेलेलंबर आई वडीलांची अब्रु जवान मुलींच्या हतात असते म्हणुन ते तिचे हात पिवळे करण्यासाठी सातत्याने काळजीत असतात. आजच्या महागाईत गोर □रीबां-ना ल□ा □र□ शक्य नाही. तरी सुध्दा लग्न करण्यासाठी तयार असताना असंख्य विघ्नांना त्यांना सामोरं जावं लागतं. सालकरी गडी मालकांना पैसे मागतो तेव्हा मालक म्हणतात "आरं गणा : इलेक्शन आलं त्याच्यात आम्ही गृहप्रवेश केलाय. माणसं जोडण्यासाठी आम्ही जिवाचं रान करतुय तुला लग्नाचं पडलयं व्हयं" (आक्रोश (हुंकार) पृष्ठ ९२) गोरगरीबाच्या मुलीच्या लग्नापेक्षा मलकाला इलेक्शन महत्वाचे वाटते पण मुलीच्या आईला मात्र ते आवडत नाही थराचा दगड थराला बसविला पाहिजे असं तिला म-नोमनी वाटत असतं परंतू तसं घडत नाही. 'हुंकार' मधील गुणाबाई आपल्या नव-याला म्हणते. "काडी लावा त्या इलेक्शनला" (आक्रोश (हुंकार) पृष्ठ ९२) तरण्याताठ्या पोरीला घरात घेवून बसण्यापेक्षा ते इलेक्शन मला नको आहे असं आपल्या मनातील दबलेल्या तिच्या भावनांचा स्फ़ोट 'हुंकार' मधून पहावयास मिळतो.

जीवन हे संघर्षशील आहे. समाजाचे संघर्षसन्मुख मनोबल वाढविण्यात डॉ. वामन जाधव यांची कथा यशस्वी ठरते. बहिरी ससान्या सारखं टपून बसलेल्या माणसांच्या वासनेनं वखवखलेल्या नजरा रोजगाराला आलेल्या बायकांवर डोळा ठेवून त्यांच्यावर अत्याचार करतात. याचे चित्रण 'चकर' या कथेत येते. कथेतील पाटील स्त्रीयांवर अत्याचार करतो परंतू त्याचीच मुलगी □ामगाराच्या पोराला घेवून पळून जाते व मांग वाड्यातील त्याची सेवा करणार चाकर बाबू त्यांना आसरा देतो व पाटलाला ताठ मानेनं त्याच्या शब्दाला शब्द देवून हाकलून लावतो. व दलित समाजावर आपली मक्तेदारी सांगणा-या धडदांडग्यांना कशी पळती भूई थोडी करुन सोडली हे समजून येते.

'गिरणी', 'अक्षय' या कथेत व्यसनाधिन होऊन आपलं आयुष्य संपविणारी, कुटूंब उद्ध्वस्त करणारी माणसं वास्तपूर्ण येतात. समाजात दारु पिणे हे प्रतिष्ठेचे मानले जाते आणि या व्यसनाच्या अहारी गेलेला आपल्या वाटणीची असलेली जमीन विकून टाकून पूर्णपणे नेस्तनाबूत होणारा जयाप्पा त्याला सागूनही त्याचं व्यवसन सुटत नाही. शेवटी दारुमूळे आपलं आयुष्य बरबाद झाल्याची जाणीव त्याला होते आणि त्याची पत्नी सुंदरा मात्र तिचं कुंकू अक्षय रहावे याची अपेक्षा 'अ□य' या कथेतून □रते. सरकारचं सहकारी क्षेत्रातील धोरणाकडं असलेला संकूचीतपणा यामूळं सहकार क्षेत्रात काम कर□ा-या मा□सांवर उपासमारीची वेळ ओढावते आणि ते व्यसनाकडे वळतात व त्यातच ते आपलं जीवन संपवून आपल्या कुटूंबाला पोरकं करतात असा व्यसनाधिनता हा समाजाला लागलेला कलंक 'गिरणी' कथेतून येतो.

नव्या युगात नव्या विचारांचा प्रसार करुन समाजाच्या विचार कृतीत बदल व्हावा ही जाणीव कथांच्या बिजात आहे. □थेच्या कथानकातून ग्रामीण समाजातील स्त्री - पुरुषांच्या जगण्यामागील कष्टाचा जाच जूलमांचा, त्यांच्यावरील अन्यायांचा

त्यांच्यावर लादलेल्या राजकीय खुर्चीचा अशा आसंख्य समस्यांचा वास्तव भाव मांडून वाचकात सहानुभूती मिळविण्यात डॉ. वामन जाधव यशस्वी ठरले आहेत.

➢ समारोप :-

जागतिकीकरणानंतर ग्रामीण जीवनाचे संदर्भ बदलेले दिसतात. खेड्याचा झपाट्याने विकास झालेला दिसतो पण विकासाच्या नावाखाली ग्रामीण जीवनात अनेक प्रश्न निर्माण झाले या प्रश्नांना वामन जाधव यांची कथा भिडताना दिसते. अशा ग्रामीण प्रश्नांची वामन जाधव यांची कथा उकल करताना दिसते. समाजातील शैक्षणिक, राजकारण व सहकारातून शोषण असे एक ना अनेक प्रश्न त्यांच्या कथेत आले आहेत. अतिशय धिटपणे लेखकाने हे प्रश्न आपल्या कथेत शब्दबध्द केले आहेत. गंभीर स्वरुपाचे कथालेखन वाचकांच्या दीर्घकाळ लक्षात राहते.

➢ संदर्भसूची :-

१. आक्रोश - डॉ. वामन जाधव
२. नेत्र - डॉ. वामन जाधव
३. अंधार - डॉ. वामन जाधव
४. माती आणि संस्कृती - संपादक डॉ. वामन जाधव
५. ग्रामीण साहित्य : प्रवाह आणि परिस्थिती - डॉ. वामन जाधव